कार्यालय परिपत्रक क्र. २८

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
कामगार व जनता संपर्क कार्यालय
दिनांक :०५/०९/२०२४

विषय :— सन २०२४—२५ या वर्षाकरिता ॲप्रेंटीस ॲक्टनुसार प्रशिक्षणार्थीची नेमणूक करणेबाबत.

पुणे महानगर परिवहन महामंडळामध्ये प्रतिवर्षी विविध ट्रेडकरिता शिकाउ प्रशिक्षणार्थीची नेमणूक करणेत येते सदरच्या नेमणूका ॲप्रेंटीस ॲक्टनुसार करणेत येत असून ॲप्रेंटीसशिपचा कालावधी हा एक वर्षाचा आहे. शिकाऊ प्रशिक्षणार्थीच्या ह्या शासकीय तांत्रिक विद्यालय औंध आयटीआय, घोले रोड, पिंपरी चिंचवड येथुन प्रशिक्षणार्थी उपलब्ध करुन घेवून उर्वरित प्रशिक्षणार्थी हे महामंडळाचे सेवकांच्या पाल्यांकडून ( मुलगा/मुलगी ) अर्ज घेवून त्यानुसार नेमणूक करणेत येते.

सन २०२४—२५ या वर्षाकरिता शिकाऊ प्रशिक्षणार्थीची नेमणूक करणेकामी महामंडळाचे सेवेत कार्यरत असलेल्या सेवकांच्या पाल्यांनी ( मुलगा/मुलगी ) इतर नातेवाईक नाही अर्जासोबत शैक्षणिक अर्हता व इतर आवश्यक कागदपत्रासह सेवकाचे वैद्यकीय कार्ड अ आयकार्डची प्रत अर्जासोबत जोडावी सेवकांच्या नातेवाईकांनी अर्ज करु नये तसेच सन २०२४—२५ करिता खालील ट्रेडच्या जागेकरिता शिकाउ प्रशिक्षणार्थी नेमणूक करणे प्रस्तावित आहे.

मोटार मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक, मोटार व्हेईकल बॉडीबिल्डर ( शिटमेटल ), ॲटो इलेक्ट्रिशियन, वेल्डर, पेंटर, प्लंबर,गवंडी, सुतार,वायरमन, कोपा, एसी रेफ्रिजरेशन, मेकॅट्रॉनिक्स.

उपरोक्ताप्रमाणे सेवकांच्या पाल्यानी दिनांक १७/०९/२०२४ पर्यंत पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे अर्ज सादर करावेत अपुर्ण अर्ज अथवा अपुर्ण कागदपत्रांची पूर्तता झाल्यास अथवा दिनांक १७/०९/२०२४ नंतर सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

०५/०९

नितीन नार्वेकर
सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रत,

सर्व विभाग प्रमुख, सर्व डेपो, सर्व डिएमई,
मुख्य कार्यालय, स्वारगेट मुख्यालय क्र. १ व २.